Vol 1 Issue 9 Oct 2011

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Reserach Journal
Vol.I,Issue.IX/Oct; 11pp.1-4 {dO` adO ISSN:-2230-7850

Research Papers

# श्रीधरस्वामी नाझरेकर एक आख्यान कवी

*विजय रेवजे*

लक्ष्मी बाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर .

## सारांश

संत साहित्याप्रमाणे पंडिती वाङ्:मयाची परंपरा मराठीत तेराव्या शातकापासून सुरू होती. महानुभाव पंथातील नरेंद्र, दामोदर पंडित, भास्करभट्ट बोरीकर हे पंडित कवीच होते. कोणत्याही समाजात कोणत्याही काळी अभिरूचीसंपन्न, उच्चभ्रू व श्रीमंत वर्ग असतो. मध्ययुगीन काळातही हा वर्ग उच्चवर्णीय धार्मिक प्रवृत्तीचा, संस्कृतभाषाप्रेमी, बहुश्रुत आणि रसिक होता. अशा रसिकांसाठी पंडिती वाङ्:मय निर्माण झाले. ते संस्कृत वाङ्:मयावर आधारलेले पांडित्यपूर्ण, कथात्मक, आध्यात्मिक, नवरसांचा आविष्कार करणारे होते. याच पंरपरेत श्रीधर स्वामी नाझरेकर हे थोर साहित्यिक होऊन गेले.

### *प्रस्तावना:-*

आपल्या रसाळ आणि सुबोध आख्यानकाव्याने ते बहुजन समाजातही लोकप्रिय ठरले. श्रीधरस्वामींचा ग्रंथ सार्वजनिकरित्या वाचला गेला नाही असे एकही गाव महाराष्ट्रात नसेल इतकी लोकप्रियता श्रीधरस्वामींच्या वाङ्:मयाला लाभली आहे.

श्रीधरस्वामींचा जन्म नाझरे (ता.सांगोला) या गावी देशपांडे घराण्यात इ.स.१६५८ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव ब्रह्माजीपंत व आईचे नाव सावित्री असे होते. त्यांचे देशपांडे घराणे धर्मशील, सात्त्विक, विठ्ठलाची परंपरा असलेले होते. त्यांचे चुलते रंगनाथ स्वामी थोर राजयोगी संत व लेखक होते. वडीलही साधुपुरूष व पंडित होते. त्यांची 'आत्मप्रकाश' (१६६२) हा ग्रंथ लिहिला आहे. श्रीधरस्वामींची गुरूपरंपरा दत्त परंपरेतील काशीच्या रामानंदांच्या आनंद संप्रदायाची होती. पित्याकडून गुरूउपदेश घेतला होता. आदिनाथ, दत्तात्रय, सहजानंद, रामाचंद, अमलानंद, गंभीरानंद, सहजानंद (पूर्णानंद) दत्तानंद, ब्रह्मानंद, श्रीधर अशी आपली आनंद संप्रदायी गुरूपरंपरा श्रीधरांनी आपल्या ग्रंथातून सांगितली आहे. १९ ज्ञानासहित भक्ती, सगुणोपासना, अद्वैतानिष्ठा ही आनंद संप्रदायाची वैशिष्ट्ये आहेत.

श्रीधरस्वामींचा जन्म भगवद्भक्त व विद्वान घराण्यात झाला असल्याने त्यांच्यावर चांगले संस्कार झाले होते. त्यांचे शिक्षण नाझऱ्यास घरच्या घरी पण विद्वानात गणना होईल इतपत झाले होते. तत्कालीन पध्दतीनुसार त्यांचे लग्न लहानपणी नाझऱ्यास झाले. पुढे वडिलांसह ते पंढरपूरला राहायला गेले. तिथे त्यांच्या व्यासंगात वाढ झाली. महाभारत, रामायण, भागवत, पुराण ग्रंथ इत्यादी संस्कृत ग्रंथांचे त्यांनी परिश्रमपूर्वक अध्ययन केले. पंचमहाकाव्ये, संस्कृतातील साहित्यग्रंथ, न्याय, व्याकरण, धर्म, ज्योतिष, वेद, उपनिषदे, गीता,योगवसिष्ठ, शंकराचार्यांची टीका, मराठीतील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, मुक्तेश्वर, रामदास व पंडित कवींच्या ग्रंथांचा श्रीधरस्वामींनी व्यासंग केला होता. श्रीधरस्वामी बहुश्रुत व विद्वान होते. त्यांनी आपल्या व्यासंगातून जे जे ग्रहण केले त्याचा प्रसंगानुरूप अत्यंत चतुराईने आपल्या ग्रंथांत वापर केला आहे.

त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धर्माचरण, व्यासंग व लेखन यांत घालविले. चारितार्थासाठी नाझऱ्याच्या देशपांडे वतनाची शेतीवाडी होती. त्यांचा सर्व काळ वाचन, भजन, कीर्तन, पुराण, आणि साधुसंत व विद्वान यांच्याशी चर्चा करण्यात जात अ से. रसाळ कीर्तनकार म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांची कीर्तन ऐकायला शास्त्रीपंडितही येत. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई होते. गृहस्थाश्रमही सुखाचा होता. त्यांना दत्तात्रय, मनोहर व रंगनाथ अशी तीन मुले होती.

ज्ञानप्राप्तीनंतर नित्यनैमित्तिक कर्माचे आचरण करीत त्यांनी आयुष्य घालविले. त्यांचा दिनक्रम संतांचा होता. घराण्याचे कुलदैवत वाटंबरे (ता.सांगोला) येथील खंडोबा हे होते. मल्हारी माहात्म्यात वडिलांच्या भक्तीला पावून तो वाटंबऱ्यास अवतरल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. त्यांचे उपास्य दैवत पंढरीचा पांडूरंग होते. तरीही अवघा एकचि ब्रह्मानंद या तत्त्वानुसार त्यांनी सर्व देवांचा स्वीकार केला होता.

श्रीधरस्वामी भक्त होते तसे पंडिती वळणाचे साहित्यिक होते. त्यांनी सव्वा लाख कविता लिहिली असल्याचे त्यांच्या चिरंजीवांनी म्हटले आहे. चि.नी. जोशी यांनी त्यांच्या उपलब्ध वाङ्:मयाची मोजदाद करून ती साठ हजार असल्याचे सिध्द केले आहे. स्फुट कविता अजूनही अप्रकाशित आहेत. त्यांची वाङ्:मयनिर्मिती प्रचंड म्हणावी इतकी मोठी असून ती गुणात्मक दृष्ट्याही बहुमोलाची आहे.

श्रीधरस्वामींनी पाच आख्यानग्रंथ, ९५ स्फुट १२ नामावली, दोन परंपरागत वर्णनपर पदसंग्रह, माहात्म्ये, स्तोत्रे, आणि नऊ संस्कृत ग्रंथ, विनोदी प्रकरणे लिहिली आहेत. स्फुट रचना प्रमुख ग्रंथरचनेपूर्वी लिहिली असावी. त्यांनी 'हरिविजय' हा ग्रंथ इ.स.१७०२ साली पंढरपूर येथे लिहिला. त्याचे ३६ अध्याय असून ८१३९ इतकी ओवीसंख्या आहे. त्यात श्रीकृष्णाचे जीवन विस्ताराने मांडले आहे. 'रामविजय' हा ग्रंथ त्याच सुमारास लिहिला. त्याचे ४० अध्याय असून ९१४७ ओव्या आहेत. त्यात रामायणाच्या आधारे प्रभू रामचंद्राचे जीवनाचे चित्रण केले आहे.

ङ्गवेदान्तसूर्य' हा सिध्दाश्रमता १७०३ साली लिहिला. त्याचे १२

*Indian Streams Reserach Journal*
Vol.1,Issue.IX/*Oct;* 11

अध्याय असून १३३९० ओव्या आहेत. वेदान्ताचे निरूपण हा त्याचा विषय आहे. 'पांडवप्रताप' हा त्यांचा गाजलेला ग्रंथ त्यांनी इ.स.१७१२ साली लिहिला. त्याचे ६४ अध्याय अ सून १३३९७ इतक्या ओव्या आहेत. पांडवाचे धीरोदत्त जीवन व त्यातील नाट्यमय संघर्ष हा त्यांचा विषय आहे.

'शिवलीलामृत' हा ग्रंथ त्यांनी १७१८ साली बारामती येथे लिहिला. २४५० ओव्यात शंकराचे चरित्र व शिवमंत्राचा महिमा वर्णिला आहे. रामायण, महाभारत हे ग्रंथ खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील सामान्य माणसापर्यंत पोहोचले ते श्रीधरस्वामींच्या 'हरिविजय' 'पांडवप्रताप' व 'रामविजय' या ग्रंथांमुळे व त्यांच्या पोथी वाचनामुळे. मुळात रामायण महाभारताच्या कथा धीरोदात्त. त्यात श्रीधरांची सहजसुलभ भाषाशैली, उत्कट प्रसंगनिर्मिती, प्रभावी व्यक्तिचित्रणे, निवेदनातील रसाळपणा, सर्वपरिचित दृष्टान्त, घरगुती वातावरण, श्रीधरस्वामींचे सात्त्विक व्यक्तिमत्त्व व भक्तिमय दृष्टिकोन यामुळे त्यांचे ग्रंथ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचले, लोकप्रिय झाले. पांडित्याचा व  अलंकाराचा अतिरेक, कृत्रिमता, संस्कृतप्रचुर भाषा हे पंडिती वाङ्:मयाचे दोष श्रीधरस्वामींच्या ग्रंथात फारच कमी प्रमाणात आढळतात. म्हणून लोकांनी हे वाङ्:मय सवीकारले. वि.ल.भावे त्यांच्या काव्यर्निर्मितीचा गौरव करताना म्हणतात, 'श्रीधरांनी जे लिहिले ते स्वच्छ भाषेत विद्वत्तेच्या भानगडीत न पडता बहुजन समाजाची नेहमीची भाषा ते वापरतात. त्यांच्या कथा, प्रेमेय, उपमा, दृष्टान्त स्त्रीशूद्रांनाही समजणारे असतात. त्यांची पोथी संकटाचा व श्रमाचा विसर पाडणारी अरसिकालाही गुगविणारी, अनंत रसवाहिनी असते. प्रेमभक्तीने खळाळत जाणारी गोड वाणी कथागान करीत जाते. देवादिकांच्या युध्दाच्या रम्य कथा ऐकून श्रोते डोलायला लागतात.

श्रीधरस्वामी प्रथम भक्त होते. त्यांची भूमिका पुराणिकाची व कीर्तन काराची होती. कीर्तनाला आवश्यक अ शी संगीतसाधनाही त्यांनी केली होती. सर्वसामान्य जनांना कथेच्या माध्यमातून परमार्थाचे ज्ञान करून देणे हा त्यांचा उद्देश सर्वार्थाने सफल झाला आहे. पंडित कवीतील श्रीधरस्वामी हे सर्वाधिक लोकप्रिय कवी होते. आजही त्यांचे ग्रंथ मोठ्या श्रध्देने वाचले जातात. श्रीधरस्वामींच्या वाङ्:मयाने लाखो लोकांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण केली आहे.

### *निष्कर्ष*

१)बहुजन समाजासाठी रसाळ आख्याने लेखन करून श्रीधरस्वामीनी महाराष्ट्रात भक्ती मार्ग रूजविला
२)आपल्या साध्या आणि सोप्या लेखन शैलीतुन श्रीधरस्वामीनी रामायण, महाभारताचे संस्कार महाराष्ट्रावर केले.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net